लोकसत्ता मुंबई वृत्तान्त

गुरुवार, २६ जुलै २००७

# महाविद्या साधक परिवार इंटरनेटवर

**प्रतिनिधी :** स्वामी रामकृष्ण परमहंस यांच्या शिकवणुकीचा प्रसार करणारे स्वामी निखिलेश्वरानंद यांच्या शिष्यसंप्रदायाने भोपाळपासून जवळच असलेल्या भोजपूर येथे निखिलधाम मंदिराची उभारणी केली असून या निमित्ताने महाविद्या साधक परिवाराची वेबसाइट सुरू करण्यात आली आहे. 'दासमहाविद्यासाधकपरिवार डॉट ऑर्ग' या वेबसाइटवर या संप्रदायाची संपूर्ण माहिती उपलब्ध आहे. सर्वसामान्य भाविकांपर्यंत महाविद्या परिवाराची शिकवण पोहोचावी यासाठी दिल्ली येथील फ्रेंच कल्चरल सेंटरचे दृकू-श्राव्य विभागाचे उपसंचालक रघु देवराज यांनी ही वेबसाइट तयार केली आहे. गुरुदेव सुदर्शननाथजी आणि गुरुमाया डॉ. साधनासिंगजी यांच्या मार्गदर्शनाखाली या संप्रदायाची वाटचाल सध्या सुरू आहे. मंदिराच्या उद्घाटन सोहळ्यासाठी महाराष्ट्रासह देशाच्या सर्व भागांतून भाविक व शिष्यगण उपस्थित होते. ■